नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३५० Issue - 350 | वार बुधवार दि. १३ मे २०२६ Blow- Wednesday Date 13 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पेपरफुटीमुळे नीट परीक्षा रद्द

## नीट पेपरफुटीचे नाशिक कनेक्शन समोर, एकाला अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पेपरफुटी झाल्याचे उघड झाल्यानंतर वैद्यकीय प्रवेशासाठी रविवार ३ मे २०२६ रोजी घेण्यात आलेली 'नीट' परीक्षा रद्द करण्यात आली आहे. राष्ट्रीय परीक्षा संस्थेने हा निर्णय घेतला आहे. आता पुढे काय होणार या प्रश्नाचे उत्तर एनटीएने दिले आहे.

पेपरफुटी प्रकरणी सीबीआय चौकशी करून पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल. ज्या विद्यार्थ्यांनी मे २०२६ च्या परीक्षेसाठी आधीच नोंदणी केली होती त्यांना पुन्हा होणार असलेल्या 'नीट' परीक्षेसाठी नव्याने नोंदणी करावी लागणार नाही. विद्यार्थ्यांना ३ मे रोजी ज्या परीक्षा केंद्रात परीक्षेसाठी बोलावले होते त्याच परीक्षा केंद्रात पुन्हा परीक्षेसाठी बोलावले जाणार आहे. परीक्षा केंद्रांच्या नियोजनात बदल केला जाणार नाही. नव्याने होणार असलेल्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना नव्याने शुल्क आकारले जाणार नाही. विद्यार्थ्यांनी ३ मे रोजी झालेल्या परीक्षेसाठी भरलेले पैसे त्यांना परत केले जातील आणि छढ स्वतःच्या अंतर्गत निधीतून फेरपरीक्षा घेणार आहे.

नीटची फेरपरीक्षा कधी होणार याचे वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाणार आहे. फेरपरीक्षेचे वेळापत्रक आणि नवीन प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याबाबतची माहिती लवकरच अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध केली जाईल, अशी माहिती राष्ट्रीय परीक्षा संस्थेने दिली आहे. परीक्षेच्या नव्या वेळापत्रकाची माहिती घेण्यासाठी एनटीएच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्या, असे आवाहन करण्यात आले आहे.

३ मे रोजी देशभरात पार पडलेली बहुचर्चित 'नीट' (छएएढ णत्रद्य) परीक्षा पेपरफुटीच्या गंभीर आरोपानंतर अखेर रद्द करण्याचा कठोर निर्णय प्रशासनाने घेतला आहे. आता या प्रकरणाचा सखोल तपास सीबीआयकडे (उइख) सोपवण्यात आला असून, दोषींवर कडक कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, या निर्णयामुळे देशभरातील तब्बल २२ लाख आणि महाराष्ट्रातील दीड लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना आता पुन्हा एकदा परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. या खळबळजनक प्रकरणात आता नाशिक कनेक्शन समोर आले आहे.

छएएढ पेपर लीक प्रकरणात म हत्त्वाची माहिती समोर आली असून नाशिकमधून (छीहळज्ञ) नीट परीक्षेचा पहिला पेपर फुटला असून येथून पहिली प्रश्नपत्रिका बाहेर पडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. प्रश्नपत्रिका लीक झाल्यानंतर पहिली कॉपी नाशिकमध्ये समोर आली. नाशिकमधील ही लीक प्रश्नपत्रिका हरियाणात पोहोचली, येथे फुटलेल्या पेपरचे १० सेट तयार करण्यात आले.



त्यानंतर, हरियाणातून बिहार, आंध्र प्रदेश, जम्मू आणि काश्मीरपर्यंत नीटची प्रश्नपत्रिका सहजपणे पोहोचल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात एकाला ताब्यात घेतल्याची देखील माहिती समोर येत आहे. नीट पेपरफुटी प्रकरणाचा तपास सीबीआयकडे देण्यात आला असून माहितीनुसार जयपूरमधून अटक करण्यात आलेला मनीष हाच पेपरफुटीचा मास्टरमाईंड असल्याचे दिसून येते. मनिषने प्रश्नपत्रिका प्रिंट होण्यापूर्वीच पेपरमधील संभावित प्रश्न माहिती करुन घेतले होते. या घोटाळ्याची व्याप्ती किती मोठी होती, याचा अंदाज यावरून येतो की, 'नीट'मधील एकूण १८० प्रश्नांपैकी तब्बल १५० प्रश्न या हस्तलिखित संचातून जसेच्या तसे विचारले गेले होते. याचा सरळ अर्थ असा की, ज्या विद्यार्थ्यांच्या हाती ही चिठ्ठी लागली, त्यांना ७२० पैकी सहज ६०० गुण मिळवणे सहज शक्य होते. या प्रचंड मोठ्या गैरव्यवहारामुळे आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय टाळण्यासाठी, ३ मे रोजी झाले-ली छएएढ णत्रद्य २०२६ ची परीक्षा अखेर अधिकृतरीत्या रद्द घोषित करण्यात आली आहे. आता, नव्या परीक्षेची तारीख लवकरच जाहीर होईल, त्यासाठी परी-क्षार्थींचे परीक्षा केंद्र ३ मे रोजीचेच राहण-ार असून विद्यार्थ्यांना नव्याने रजिस्ट्रेशन करण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांकडून नव्या परीक्षेसाठी शुल्क घेतले जाणार नाही, मात्र नव्या परीक्षेसाठी नवे ओळखपत्र दिले जाणार आहे. विद्यार्थी,पालकांनी फक्त एनटीएच्या सूचनांवर लक्ष ठेवावे, असे आवाहन केंद्राकडून करण्यात आले आहे.

# आनंदाची बातमी, अंदमानात 'मान्सून'साठी पोषक वातावरण; कोकणात ६ जूनला आगमनाचा अंदाज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राज्यात एकीकडे कडाक्याचे ऊन आणि उष्णतेची लाट असतानाच, दुसरीकडे मान्सूनच्या आगमनाबाबत दिलासादायक बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, अंदमानचा समुद्र आणि निकोबार बेटांच्या काही भागात मान्सून दाखल होण्यासाठी अत्यंत अनुकूल वातावरण तयार झाले आहे.



हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, पुढील ४८ तासांत मान-सून दक्षिण अंदमान समुद्र आणि बंगालच्या उपस-ागरात दाखल होण्याची शक्यता असून, ३१ मे पर्यंत तो केरळमध्ये पोहोचेल. त्यानंतर मान्सूनचा प्रवास पुढे सरकत ५ जून रोजी गोव्यात, ६ जून रोजी कोकणात आणि ७ जूनपर्यंत पुण्यापर्यंत पावसाचे आगमन होण्याचा अंदाज आहे.

हवामान विभागाने एक म हत्त्वाची बाब नमूद केली आहे ती म्हणजे, यंदा मान्सूनच्या प्रवासादरम्यान बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ तयार झालेले नाही. चक्रीवादळाचा अडथळा नसल्यामुळे मान्सून कोणत्याही व्यत्ययाविना वेळेत प्रगती करू शकेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

राज्यात तूर्त उन्हाचा तडाखा कायम : मान्सूनची बातमी सुखावणारी असली तरी, पुढील काही दिवस महाराष्ट्रात उन्हाचा कडाका कायम राहणार आहे. १५ मे पर्यंत राज्यातील विविध भागांत तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होईल. राज्यातील काही भागांत १८ मे पर्यंत तापमान चढेच राहणार असून, उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.

सांख्यिकीय पद्धत : २००५ पासून हवामान विभाग केरळमधील मान्सूनच्या आगमनासाठी प्रगत सांख्यिकीय पद्धतीचा वापर करत आहे. जरी विभाग इतर राज्यांसाठी अधिकृत तारखा जाहीर करत नसला, तरी उप-लब्ध डेटाच्या आधारे मान्सूनच्या प्रगतीचा अंदाज वर्तवला जा-तो, जो शेतकऱ्यांसाठी आणि नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

# इराण युद्धाचा फटका! १५ मे नंतर पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत वाढ होण्याची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : मध्य पूर्वेतील वाढत्या तणावाचा परिणाम जगभर जाणवत आहे. यामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. परिणामी, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती पुन्हा वाढू शकतात, असे वृत्त आहे. वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतींमुळे सरकार, तेल कंपन्या आणि देशाच्या आयात बिलावर दबाव येत आहे, ज्यामुळे सरकारला एक योजना आखावी लागत आहे.

इराण युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने पेट्रोल आणि डिझेलच्या किमती पुन्हा वाढू शकतात. अर्थतज्ज्ञांच्या मते, ब्रेंट क्रूड तेलाच्या किमती प्रति बॅरल १०५ डॉलरच्या वर पोहोचल्याने तेल कंपन्या, सरकार आणि देशाच्या आयात बिलावरील दबाव झपाट्याने वाढत आहे. तज्ज्ञांनी सांगितले आहे की, १५ मे नंतर पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढण्याची दाट शक्यता आहे.

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ४ ते ५ रुपयांनी, तर एलपीजी सिलेंडरच्या दरात ४० ते ५० रुपयांनी वाढ होण्याचा अंदाज आहे. सरकारी तेल कंपन्या सध्या बाजारभावापेक्षा कमी दरात इंधन विकत आहेत, ज्यामुळे त्यांना दरमहा अंदाजे ३०००० कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. कच्च्या तेलाच्या किमती दीर्घकाळ वाढलेल्या राहिल्यास, हा दबाव हाताळणे कठीण होईल. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ८५ टक्केपेक्षा जास्त तेल आयात करतो. परिणामी, आंतरराष्ट्रीय तेलाच्या किमती आणि पश्चिम आशियातील तणावाचा भारतावर थेट परिणाम होतो. महागाईवर मोठा परिणाम टाळण्यासाठी सरकार अचानक मोठी दरवाढ करण्याऐवजी हळूहळू दरवाढ करण्यास प्राधान्य देईल. व्ही. के. विजयकुमार यांच्या मते, पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात हळूहळू वाढ करणे हा सरकारसाठी अधिक सुरक्षित आणि सोपा पर्याय असेल.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निर्णय

# पोलीस गृहनिर्माण योजना पुन्हा सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी अहोरात्र राबणाऱ्या पोलिसांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१७ मध्ये पोलीस गृहनिर्माण व्याजसवलत अनुदान योजना योजना सुरू केली होती. मात्र, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात ही योजना बंद करण्यात आली. आता ही योजना पुन्हा सुरू करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ५ हजार ४५९ पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या घरांसाठी १ हजार ७६८ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली.

**५,४५९ पोलिसांच्या घरांसाठी १,७६८ कोटींचा निधी मंजूर**



गृह विभागाने मंगळवारी याबाबत शासन निर्णय जारी केला. त्यानुसार, पात्र पोलीस कर्मचाऱ्यांना बँकांमार्फत घरबांधणी कर्ज उपलब्ध करून दिले जाईल. या कर्जावरील व्याजाचा संपूर्ण भार राज्य सरकार उचलणार असून, त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे प्रलंबित अर्जांपैकी ५ हजार ४५९ पात्र पोलीस कर्मचाऱ्यांच्या घराचा म ार्ग मोकळा झाला आहे. यात एकूण १७६८.०८ कोटी रुपयांची आर्थिक मर्यादा निश्चित करण्यात आली असून, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत हा निधी वितरित केला जाईल. बँकांनी मंजूर केलेल्या कर्जाच्या प्रमाणात हा निधी टप्प्याटप्प्याने पोलिसांना उपलब्ध करून दिला जाणार आहे.

या निर्णयाची माहिती देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाविकास आघाडीवर टीका केली. ते म्हणाले, जनतेच्या सुरक्षेसाठी सातत्याने कार्यरत आपल्या पोलिसांना घरे मिळाली पाहिजे, यासाठी प्रारंभीपासून मी आग्रही राहिलो आहे. त्यामुळेच २०१४ ते २०१९ या काळात मोठ्या संख्येने पोलिसांना घरांसाठी व्याजसवलत अनुदान योजना राबविण्यात आली. महाविकास आघाडीच्या काळात ती योजना बंद केली गेली होती. नंतर पुन्हा आम्ही ती योजना सुरु केली. आज मला सांगताना आनंद होतो की, आमच्या ५ हजार ४५९ पोलिसांना घरांसाठी घरबांधणी अग्रीम म्हणून १ हजार ७६८.०८ कोटी रुपयांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण म हामंडळाकडे आलेल्या या प्रस्तावांसाठी ही रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

# वादळी वाऱ्यासह पावसानं भिंत कोसळली, सहा भाविकांचा मृत्यू

सांगली : सांगली जिल्ह्या-तील जत तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. मोटेवाडी गावच्या हद्दीत वादळी वाऱ्यानं मोठी दुर्घटना घडली आहे. वादळी वारा आणि पावसाने एका मंदिराच्या परिसरातील भिंत कोसळून सहा भाविकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तर काही भाविक गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेनं सांगली जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

जत तालुक्यातील मोटेवाडी गावच्या हद्दीत दुर्दैवी घटना घडली आहे. वादळी वारा आणि पावसाने एका मंदिराच्या परिसरातील भिंत कोसळून सहा भाविकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तर काही भाविक गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना जत मधील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे.

मृतांची नावे - शंकर आबा लोखंडे पाडोझरी, मंगल भाऊसो मोठे पांडोजरी, संजूबाई राम चौधरी पांडोजरी , कोंडीबा गेजगे दरीबडची तर आणखी दोन भाविकांचा मृत्यू झाला आहे, असे एकूण सहा भाविकांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. र अनेक भाविका गंभीर जखमी झाले आहेत.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, जत तालुक्यातील मोटेवाडी येथे मरगुबाई देवीची यात्रा मंगळवारी भरली होती. भाविकांची मोठी गर्दी होती. वादळी वाऱ्यामुळे व पावसामुळे भाविकांनी शेडच्या भिंतीला आडोसा म्हणून आसरा घेतला पण भिंत चिऱ्याच्या दगडाच्या बांधकामाची होती. वाऱ्याच्या तडाख्याने भिंत कोसळली त्याम ध्ये (पान २ वर...)

### हवामान विभागाचा इशारा, काळजी घेण्याचं आवाहन

# सावधान! महाराष्ट्रासाठी पुढचे ३ दिवस महत्वाचे, विक्रमी तापमानाची नोंद होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दिवसेंदिवस राज्यातील तापमानात मोठी वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या तापमानाचा मोठा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. विशेषत विदर्भात तापमानाचा पारा चांगलाच वाढला आहे. बहुतांश जिल्ह्यात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. दरम्यान, महाराष्ट्रात पुढील ३ दिवस उष्णतेची लाटेचा इशारा देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र मराठवाडा उच्चांकी तापणार आहे. पुढील ३ दिवसात राज्यातील उष्माघाताचा धोका वाढण्याची शक्यता आहे. पुढील ३ दिवस म हाराष्ट्राच्या बहुतांश जिल्ह्याना उन्हाचा येलो अलर्ट जारी करण्यात आल्याची माहिती पुणे हवामान विभागाकडून सांगण्यात आली आहे.

नागरिकांनी पुढील ३ दिवस विशेष काळजी घेण्याची गरज

अकोला आणि नंदुरबार जिल्ह्याचे तापमान ४५.३ अंशाच्या पुढे आहे. सद्या राज्यातील बहुतांश जिल्ह्याचे तापमान ४० च्या पुढे आहे. नागरिकांनी पुढील ३ दिवस विशेष काळजी घेण्याची गरज असल्याचे पुणे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे. पुढील ५ दिवसात पा-वसाची शक्यता नसल्याने तापमान घटण्याची शक्यता कमीच असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. दरम्यान, पुढील चार ते पाच दिवसात विदर्भात तापमानात मोठी वाढ होणार असल्याचा इश-ारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे. विदर्भातील काही भागात यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.



प्रादेशिक हवामान विभागाच्या नागपूर केंद्राकडून संपूर्ण विदर्भासाठी उष्णतेचा 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला असून, येत्या चार ते पाच दिवसांत तापमानात मोठी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मे महिन्याच्या उत्तरार्धात विदर्भात पुन्हा एकदा तीव्र उष्णतेच्या लाटेचा फटका बसण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

विदर्भात उष्णतेच्या लाटेसाठी पोषक वातावरण

सध्या विदर्भात उष्णतेच्या लाटेसाठी पोषक वातावरण तयार झाले असून, 'वेस्टर्न डिस्टर्बन्स'चा प्रभाव कमी होत चालल्याने उत्तरेकडील राज्यांतून गरम वारे वाहू लागले आहेत. त्याचा थेट परिणाम विदर्भाच्या तापमानावर होत असून, पुढील काही दिवसांत तापमानात तब्बल ४ ते ६ अंश सेल्सिअसपर्यंत वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे विदर्भातील अनेक भागांमध्ये पारा पुन्हा ४५ ते ४६ अंश सेल्सिअसच्या पुढे जाण्याची दाट शक्यता आहे.

येत्या काही दिवसांत उकाडा आणखी वाढण्याची शक्यता

एप्रिल महिन्यात यंदाच्या हंगामातील उच्चांकी तापमानाची नोंद झाली होती. त्यानंतर काही दिवस वाता-वरणात थोडा दिलासा मिळाला होता. मात्र, आता पुन्हा एकदा तापमान झपाट्याने वाढू लागल्याने नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे. नागपूरसह अकोला, अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये उष्णतेची तीव्रता वाढू लागल्याचे चित्र दिसून येत आहे. हवामान विभागाने नागरिकांना दुपारच्या वेळेत अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे.

पुरेसे पाणी पिणे, हलका आहार घेणे तसेच उन्हापासून संरक्षणासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे आ-वाहनही करण्यात आले आहे. कालपासूनच विदर्भात उष्णलाटेचा प्रभाव तीव्र झाल्याचे जाणवत असून, येत्या काही दिवसांत उकाडा आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

विदर्भात कोणत्या जिल्ह्यात किती तापमान?- अकोला - ४४.९ अमरावती - ४४.६ बुलढाणा - ४२.६ ब्रम्हपुरी - ४२.२ चंद्रपूर - ४२.० गडचिरोली - ४१.२ गोंदिया - ४०.४ नागपूर - ४२.२ वर्धा - ४३.२

## संपादकीय....

### मान्सूची चाहूल

राज्यात एकीकडे कडाक्याचे ऊन आणि उष्णतेची लाट असतानाच, दुसरीकडे मान्सूनच्या आगमनाबाबत दिलासादायक बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, अंदमानचा समुद्र आणि निकोबार बेटांच्या काही भागात मान्सून दाखल होण्यासाठी अत्यंत अनुकूल वातावरण तयार झाले आहे. पुढील ४८ तासांत मान्सून दक्षिण अंदमान समुद्र आणि बंगालच्या उपसागरात दाखल होण्याची शक्यता असून, ३१ मे पर्यंत तो केरळमध्ये पोहोचेल. त्यानंतर मान्सूनचा प्रवास पुढे सरकत ५ जून रोजी गोव्यात, ६ जून रोजी कोकणात आणि ७ जूनपर्यंत पुण्यापर्यंत पावसाचे आगमन होण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने एक महत्त्वाची बाब नमूद केली आहे ती म्हणजे, यंदा मान्सूनच्या प्रवासादरम्यान बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ तयार झालेले नाही. चक्रीवादळाचा अडथळा नसल्यामुळे मान्सून कोणत्याही व्यत्ययाविना वेळेत प्रगती करू शकेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. मान्सूनची बातमी सुखावणारी असली तरी, पुढील काही दिवस महाराष्ट्रात उन्हाचा कडाका कायम राहणार आहे. १५ मे पर्यंत राज्यातील विविध भागांत तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होईल. राज्यातील काही भागांत १८ मे पर्यंत तापमान चढेच राहणार असून, उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. केरळमधील मान्सूनच्या आगमनासाठी प्रगत सांख्यिकीय पद्धतीचा वापर करत आहे. जरी विभाग इतर राज्यांसाठी अधिकृत तारखा जाहीर करत नसला, तरी उपलब्ध डेटाच्या आधारे मान्सूनच्या प्रगतीचा अंदाज वर्तवला जातो, जो शेतकऱ्यांसाठी आणि नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

## भारतातील पत्रकारिता : लोकशाहीचा चौथा स्तंभ की संघर्षाच्या उंबरठ्यावर उभा असलेला आवाज?

आजच्या भारतात पत्रकारिता एका अत्यंत कठीण वळणावर येऊन उभी राहिली आहे. पत्रकार आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि मानसिक दबावाखाली काम करत आहेत. माध्यम संस्थांची विश्वासार्हता कमी होत चालली आहे आणि लोकशाहीचा चौथा स्तंभ स्वतःच अस्तित्वासाठी झगडताना दिसत आहे.

भारतामध्ये आज सुमारे १ लाखांहून अधिक नोंदणीकृत वृत्तपत्रे आणि हजारो न्यूज पोर्टल्स आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार देशात ९०० पेक्षा अधिक टीव्ही चॅनेल्स कार्यरत आहेत, त्यापैकी सुमारे ४०० न्यूज चॅनेल्स आहेत. डिजिटल माध्यमांच्या विस्फोटामुळे पत्रकारितेचा व्याप वाढला असला तरी त्याच वेळी गुणवत्तेचा आणि विश्वासाचा प्रश्न गंभीर बनला आहे. इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे माहितीचा वेग प्रचंड वाढला; परंतु सत्याची पडताळणी, नैतिकता आणि जबाबदारी यांचा वेग मात्र कमी झाला. आज फेसबुक, यूट्यूब, व्हॉट्सॲप किंवा एक्स (ट्विटर) यांसारख्या माध्यमांवर काही सेकंदांत लाखो लोकांपर्यंत कोणतीही माहिती पोहोचते. समस्या अशी की, त्यातील मोठा भाग अप्रमाणित किंवा दिशाभूल करणारा असतो. रॉयटर्स पत्रकारिता अध्ययन संस्थाच्या रिपोर्ट नुसार भारतातील सुमारे ५५ टक्क्यांहून अधिक लोक सोशल मीडियावरून बातम्या मिळवतात. यामुळे पारंपरिक पत्रकारितेवरील विश्वास डळमळीत होत चालला आहे.

आजच्या पत्रकारितेतील सर्वात गंभीर संकट म्हणजे राजकीय हस्तक्षेप. अनेक मीडिया संस्थांवर थेट किंवा अप्रत्यक्ष राजकीय प्रभाव असल्याचे दिसते. सत्ताधाऱ्यांच्या बाजूने झुकणारी भूमिका, विरोधी विचारांना कमी जागा, टीका करणाऱ्या पत्रकारांवर कारवाई, जाहिरातींचा दबाव आणि ट्रोल आर्मीचा वापर ही परिस्थिती आता सामान्य झाली आहे. सीमाविना पत्रकार संघटना या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या २०२५ च्या प्रेस फ्रीडम इंडेक्समध्ये भारताचा क्रमांक १५९ च्या आसपास नोंदवला गेला, जो लोकशाही राष्ट्रासाठी चिंतेचा विषय मानला जातो. या अहवालात पत्रकारांवरील दबाव, अटक, ऑनलाइन धमक्या आणि सरकारी हस्तक्षेप यांचा उल्लेख करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांत अनेक पत्रकारांवर देशद्रोह, यु ये पी ये किंवा सायबर गुन्ह्यांचे खटले दाखल झाल्याच्या घटना समोर आल्या. ग्रामीण भागातील पत्रकार तर अधिक असुरक्षित आहेत. स्थानिक भ्रष्टाचार, वाळू माफिया, अवैध धंदे किंवा राजकीय गैरव्यवहार उघड करणाऱ्या पत्रकारांवर हल्ले झाल्याच्या घटना वारंवार घडतात.



भारतामधील ग्रामीण पत्रकारितेची अवस्था तर अत्यंत वेदनादायक आहे. जिल्हा आणि तालुका स्तरावर काम करणाऱ्या हजारो पत्रकारांना नियमित पगार नसतो. अनेक जण केवळ ओळखपत्र आणि समाजातील प्रतिष्ठेच्या आधारावर पत्रकारिता करत आहेत. भारतीय प्रेस परिषद आणि विविध पत्रकार संघटनांच्या अभ्यासानुसार ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणातील पत्रकारांना दरमहा ५ हजार ते १० हजार रुपयांपेक्षाही कमी मानधन मिळते. अनेकांना कोणतेही विमा संरक्षण, आरोग्य सुविधा किंवा निवृत्ती योजना उपलब्ध नाहीत. स्वतःच्या पैशातून प्रवास करून, मोबाईल इंटरनेट वापरून आणि अनेक धोके पत्करून ते बातम्या गोळा करतात. कोरोनाच्या काळात अनेक पत्रकारांनी जीव धोक्यात घालून काम केले; परंतु त्यापैकी अनेकांना सरकारी मदत किंवा अधिकृत फ्रंटलाइन वर्कर दर्जाही मिळाला नाही. ही वस्तुस्थिती पत्रकारितेच्या दुर्लक्षित बाजूचे अत्यंत तीव्र चित्र दाखवते.

पत्रकारितेवर वाढणारा कॉर्पोरेट प्रभाव हे दुसरे मोठे संकट आहे. देशातील अनेक प्रमुख मीडिया हाऊसेस आता मोठ्या उद्योगसमूहांच्या मालकीची आहेत. परिणामी अनेकदा जनहितापेक्षा व्यावसायिक हितसंबंधांना प्राधान्य दिले जाते. जाहिरातींवर चालणाऱ्या माध्यमांना सरकार आणि कॉर्पोरेट क्षेत्राचा दबाव सहन करावा लागतो. टीआरपीच्या स्पर्धेत गंभीर विषयांपेक्षा आरडाओरडा, धार्मिक ध्रुवीकरण, सेलिब्रिटी गॉसिप आणि सनसनाटी चर्चांना अधिक महत्त्व दिले जाते. ब्रेकिंग न्यूजच्या स्पर्धेत सत्याची शहानिशा करण्यासाठी लागणारा वेळ कमी झाला आहे. परिणामी चुकीच्या बातम्या, अर्धवट माहिती आणि समाजात द्वेष पसरवणारे कथानक वाढू लागले आहेत.

पत्रकारितेतील नैतिक अधोगती हाही चिंतेचा विषय बनला आहे. पेड न्यूज ही संकल्पना आता उघड गुपित राहिलेली नाही. निवडणुकांच्या काळात पैसे घेऊन सकारात्मक बातम्या प्रकाशित करण्याचे प्रकार अनेकदा समोर आले आहेत. काही ठिकाणी पत्रकारितेचा वापर ब्लॅकमेलिंगसाठी किंवा वैयक्तिक स्वार्थासाठी केल्याच्या घटनाही घडल्या. यामुळे समाजातील सामान्य माणसाचा माध्यमांवरील विश्वास कमी झाला आहे. एडलमन ट्रस्ट बॅरोमीटर (विश्वास निर्देशांक) च्या अभ्यासानुसार जगभरात पारंपरिक माध्यमांवरील लोकांचा विश्वास घटत आहे आणि भारतातही ही स्थिती वेगळी नाही. जेव्हा प्रामाणिक पत्रकार आणि स्वार्थी पत्रकार यांच्यातील सीमारेषा धूसर होते, तेव्हा संपूर्ण पत्रकारितेची प्रतिमा मलीन होते.

डिजिटल पत्रकारितेने अनेक नवीन संधी निर्माण केल्या असल्या तरी रोजगाराचे संकटही वाढवले आहे. अनेक मीडिया संस्थांनी खर्च कमी करण्यासाठी कर्मचारी कपात केली. कॉन्ट्रॅक्ट बेसवर काम करणाऱ्या पत्रकारांची संख्या वाढली. कमी पगार, जास्त कामाचे तास, मानसिक ताण आणि नोकरीची असुरक्षितता ही परिस्थिती सर्वसामान्य झाली आहे. मोठ्या शहरांमध्येही अनेक पत्रकारांना स्थिर आयुष्य जगणे कठीण झाले आहे. काही अभ्यासानुसार भारतातील डिजिटल न्यूज प्लॅटफॉर्मवरील पत्रकारांपैकी मोठा वर्ग बर्नआउट आणि मानसिक तणावाचा सामना करत आहे.

यातील सर्वात गंभीर परिणाम म्हणजे लोकशाहीवर होणारा प्रभाव. पत्रकारिता कमकुवत झाली तर समाजातील सत्तेवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा कमकुवत होते. पत्रकार हे केवळ बातम्या देणारे लोक नसतात; ते भ्रष्टाचार उघड करतात, सामान्य माणसाचा आवाज बनतात, प्रशासनाला जबाबदार धरतात आणि समाजातील दुर्लक्षित प्रश्न समोर आणतात. जेव्हा पत्रकार घाबरतो किंवा विकला जातो, तेव्हा लोकशाहीचा आत्माच धोक्यात येतो.

या परिस्थितीत काही मूलभूत सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे. पत्रकार संरक्षण कायदा ही काळाची गरज बनली आहे. विशेषतः ग्रामीण आणि स्वतंत्र पत्रकारांना कायदेशीर सुरक्षा, विमा आणि आर्थिक संरक्षण मिळाले पाहिजे. मीडिया मालकीतील पारदर्शकता वाढवली पाहिजे. पत्रकारितेच्या शिक्षणात नैतिकता आणि तथ्य पडताळणीला अधिक महत्त्व दिले पाहिजे. फेक न्यूजविरोधात कठोर यंत्रणा उभी करणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे पत्रकारितेला पुन्हा मिशन म्हणून पाहण्याची गरज आहे. पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नाही; ती समाजाप्रती असलेली नैतिक जबाबदारी आहे.

आज भारतातील पत्रकारिता एका निर्णायक टप्प्यावर उभी आहे. एका बाजूला तंत्रज्ञान, वेग आणि अमर्याद पोहोच आहे; तर दुसऱ्या बाजूला दबाव, अविश्वास आणि आर्थिक असुरक्षितता आहे. या संघर्षात जर सत्य, नैतिकता आणि लोकहित हरवले, तर नुकसान केवळ पत्रकारांचे होणार नाही; संपूर्ण लोकशाहीचे होईल. कारण जेव्हा समाजातील प्रश्न विचारणारे आवाज कमकुवत होतात, तेव्हा सत्तेला निरंकुश होण्यास वेळ लागत नाही. म्हणूनच पत्रकारितेचे रक्षण करणे म्हणजे लोकशाहीचे रक्षण करणे होय.

**– संदीप काळे**
**संस्थापक तथा आंतराष्ट्रीय अध्यक्ष व्हॉईस ऑफ मीडिया, व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम मुंबई, दिल्ली**
**९८९००९८८६८**

## वादळी वाऱ्यासह पावसानं भिंत कोसळली, सहा भाविकांचा मृत्यू

६ भाविकांचा मृत्यू तर तिघेजण गंभीर जखमी, इतर १५ जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. जत प्रशासन व पोलिसांची तातडीने धाव घेतली असून जतचे प्रांताधिकारी नष्टे यांची घटनास्थळी भेट, जखमींना तातडीने रुग्णालयात हलवले आहे. मृतांपैकी तीन जण विजापूर तालुक्यातील व तीन जण जत तालुक्यातील आहेत.

जत तालुक्यातील मोटेवाडी येथे मरगुबाई देवीची यात्रा मंगळवारी भरली होती. त्यामुळं या ठिकाणी भाविकांची मोठी गर्दी जमली होती. पण अचानक सोसाट्याचा वारा आणि पाऊस आल्यामुळं भिंत कोसळल्याची घटना घडल्याची माहिती प्रांताधिकारी अजय कुमार नष्टे यांनी दिली आहे. बांधकामावरी पत्रे उडून भिंतीवर पडले त्यामुळं भिंत पडली. यामध्ये एकूण सहा जणांचा मृत्यू झाला आहे. तर २० ते २५ भाविक जखमी झाल्याची माहिती प्रांताधिकारी अजय कुमार नष्टे यांनी दिली आहे.

### मातृभाषेची उपेक्षा की शिक्षण व्यवस्थेचे अपयश?

## दहावी परीक्षेत मराठीत ९४ हजार विद्यार्थी अनुत्तीर्ण; महाराष्ट्रासाठी धोक्याची घंटा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेच्या निकालात मराठी विषयात तब्बल ९४ हजार विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्याची बाब समोर आली आणि संपूर्ण महाराष्ट्रात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. ज्या महाराष्ट्राची ओळख संतांची भाषा, शिवरायांची भाषा आणि साहित्यिकांचा वारसा लाभलेली मराठी म्हणून आहे, त्या राज्यात मातृभाषेतच एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी अपयशी ठरणे ही अत्यंत गंभीर आणि आत्मपरीक्षण करायला लावणारी घटना आहे.

ही केवळ एका विषयातील अपयशाची बाब नाही, तर आपल्या बदलत्या सामाजिक मानसिकतेचे, शिक्षण पद्धतीतील त्रुटींचे आणि भाषिक दुर्लक्षाचे स्पष्ट चित्र आहे. मराठी विषयाला कमी लेखण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. मराठी तर सहज पास होतो हा गैरसमज विद्यार्थ्यांमध्ये पसरला असून त्याचा परिणाम थेट निकालावर दिसून येत आहे.

मातृभाषेपासून दूर जात असलेली पिढी

आजच्या डिजिटल आणि इंग्रजीप्रधान युगात अनेक पालक आपल्या मुलांनी इंग्रजी माध्यमातून शिकावे यासाठी प्रयत्नशील आहेत. इंग्रजी शिकणे आवश्यक असले तरी त्यासाठी मातृभाषेची उपेक्षा करणे योग्य नाही. दुर्दैवाची बाब म्हणजे अनेक घरांमध्ये मराठी बोलणेही कमी झाले आहे. मोबाईल, सोशल मीडिया आणि इंटरनेटमुळे विद्यार्थ्यांची भाषाशैली बदलत चालली आहे. शुद्ध लेखन, व्याकरण, वाचन आणि विचार मांडण्याची क्षमता यामध्ये मोठी घसरण होताना दिसत आहे.

पूर्वीच्या काळात विद्यार्थ्यांना मराठी साहित्य, कविता, कथा, लोककथा आणि चरित्रग्रंथ वाचण्याची आवड होती. आज मात्र वाचन संस्कृतीच कमी होत चालली आहे. दोन ओळींचा संदेश लिहितानाही अनेक विद्यार्थी शुद्ध मराठी लिहू शकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.



शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी

मराठी विषय शिकवताना अनेक शाळांमध्ये आवश्यक गांभीर्य दिसत नाही. विद्यार्थ्यांना भाषेचा आत्मा समजावून सांगण्याऐवजी केवळ परीक्षा पास होण्यासाठी शिकवले जाते. पाठांतरावर भर दिला जातो; मात्र भाषेची समज, लेखनकौशल्य, आकलन क्षमता आणि विचार व्यक्त करण्याची सवय विकसित केली जात नाही.

काही शाळांमध्ये मराठी विषयासाठी पुरेसा वेळ दिला जात नाही. इंग्रजी, विज्ञान आणि गणित या विषयांवर जास्त भर दिला जातो, तर मराठी दुय्यम ठरते. शिक्षकांवरही अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे दडपण असल्यामुळे भाषिक गुणवत्ता वाढवण्यासाठी आवश्यक उपक्रम राबवले जात नाहीत.

पालकांची भूमिकाही महत्त्वाची

विद्यार्थ्यांच्या या अपयशामागे पालकांची मानसिकताही काही प्रमाणात कारणीभूत आहे. अनेक पालक मुलांनी इंग्रजी बोलावे यासाठी आग्रही असतात; मात्र मराठी वाचन, लेखन किंवा भाषिक विकासाकडे लक्ष देत नाहीत. घरात मराठी वृत्तपत्र, पुस्तके किंवा साहित्य वाचनाची सवय कमी होत आहे. मुलांनी मातृभाषेत सक्षम होणे ही त्यांच्या बौद्धिक विकासासाठी आवश्यक बाब आहे. संशोधनातूनही हे सिद्ध झाले आहे की मातृभाषेवर प्रभुत्व असलेले विद्यार्थी इतर भाषा आणि विषय अधिक चांगल्या प्रकारे आत्मसात करू शकतात.

मराठी भाषा ही अस्मितेचा विषय

मराठी भाषा ही केवळ एक विषय नाही, तर महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मराठी भाषेमुळे जनतेपर्यंत पोहोचले. या भाषेने महाराष्ट्राला सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक ओळख दिली.

आज जर विद्यार्थ्यांना स्वतःची भाषा नीट लिहिता-वाचता येत नसेल, तर भविष्यात आपली सांस्कृतिक मुळे कमकुवत होण्याचा धोका आहे. मातृभाषेचा अभिमान हरवणारा समाज कधीच वैचारिकदृष्ट्या सक्षम होऊ शकत नाही.

उपाययोजना काय?

ही परिस्थिती बदलण्यासाठी शासन, शिक्षक, पालक आणि समाज यांनी एकत्र येणे गरजेचे आहे.

शाळांमध्ये मराठी वाचन संस्कृती वाढवावी.

विद्यार्थ्यांसाठी निबंध, वक्तृत्व, कविता वाचन, कथाकथन यांसारखे उपक्रम नियमित घ्यावेत.

मराठी भाषेतील दर्जेदार साहित्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावे.

मोबाईल आणि सोशल मीडियाचा अतिरेक कमी करून वाचनाची सवय लावावी.

पालकांनी घरात मराठी संभाषणाला प्रोत्साहन द्यावे.

शिक्षकांनी केवळ गुणांसाठी नव्हे तर भाषेची गोडी निर्माण करण्यासाठी अध्यापन करावे.

आत्मपरीक्षणाची वेळ

डडउ परीक्षेत मराठी विषयात ९४ हजार विद्यार्थी नापास होणे ही महाराष्ट्रासाठी मोठी धोक्याची घंटा आहे. ही परिस्थिती वेळेत सुधारली नाही तर भविष्यात मराठी भाषेचे अस्तित्व आणि समृद्ध वारसा दोन्ही धोक्यात येऊ शकतात.


मराठी ही केवळ व्यवहाराची भाषा नाही, तर आपल्या ओळखीचा पाया आहे. मातृभाषेचे जतन करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी मराठी विषयाकडे केवळ परीक्षा म्हणून नव्हे, तर संस्कृती आणि अस्मितेचा भाग म्हणून पाहिले पाहिजे.

आज गरज आहे ती मराठीचा अभिमान जागवण्याची, वाचन संस्कृती पुन्हा रुजवण्याची आणि पुढील पिढीला आपल्या भाषेचे महत्त्व पटवून देण्याची. अन्यथा उद्या इतिहास आपल्याला माफ करणार नाही.

**– धोंडपा नंदे, वागदरी**

## निफाड इंग्लिश स्कूलचा ७०.९६ टक्के निकाल

### निफाड इंग्लिश स्कूलमध्ये अमन बाळू सानप प्रथम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत असणाऱ्या माध्यमिक विभागाचा निकाल घोषित झाला असून निफाड इंग्लिश स्कूल चा निकाल ७०.९६% लागला आहे यामध्ये प्रथम पाच क्रमांक १)सानप अमन बाळू ८७.८० % २).निऱ्हाळी शाहू सचिन ८५.२० % ३).शेख जिनत इकबाल ८१.४० % ४)बागडे ओमाक्षी शेखर ८० % ५) साटोटे सोनल संजय ७६.२० % याप्रमाणे लागला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष .प्रकाशजी वैशंपायन , उपाध्यक्ष .प्रभाकर कुलकर्णी, सेक्रेटरी हेमंत बरकले स्कूल कमिटी चेअरमन ॲड.प्रविण ठाकरे ग.कौ. सदस्य व सरस्वती विद्यालयाचे चेअरमन .नंदलालजी चोरडीया ,सौ.ज्योती बागडे, शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी तसेच सर्व संस्था व शाळा पदाधिकारी यांनी सर्व विद्यार्थिनींचे व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## द.ह. कवठेकर प्रशालेत गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या द. ह. कवठेकर प्रचारित मार्च २०२६ माध्यमिक शालांत परीक्षेत उज्वल यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा नाना मालक कवठेकर,



मानस सचिव गुरुवर्य श्री एस आर पटवर्धन सर पदाधिकारी श्री एस पी कुलकर्णी सर डॉक्टर मिलिंद जोशी शाळा व्यवस्थापन समितीच्या राज होनमाने प्राचार्यांची जेष्ठ परीक्षक श्री जे एम शेलार सर तसेच शिक्षक बंधू बहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रचाराची मुख्याध्यापक श्री व्ही एम कुलकर्णी सर यांनी मार्च २०२० च्या माध्यमिक शाळांत परीक्षेतील प्रशालीचा ९४% निकाल आणि विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या गुणवत्तेची माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रसारित राबवण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमाचा आढावा आणि त्यांनी उपस्थितांच्या समोर मांडला. यावेळी प्रशालेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा फेटा हा पुष्प-गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला सत्कारमूर्ती विद्यार्थ्यांमध्ये चि. अथर्व अमित वाडेकर( १००% ) कुमारी सानवी सचिन कडून. (९९.६०%) चि. सार्थक सिद्धेश्वर लेंगरे (९९.२०%) कुमारी धनवी राहुल लिगाडे( ९७.४०%) कुमारी सही मनीष तेंडुलकर (९७.२०%) यांचा समावेश होता. सत्कार प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत आपल्या देशामध्ये द.ह. कवठेकर प्रशालीची आणि शिक्षकांचे अत्यंत महत्त्वाचे योगदान असल्याची सांगितले संस्थेचे मानत सचिव गुरुवर्य एस आर पटवर्धन सर यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्या बाबत मार्गदर्शन करताना सातत्य परिश्रम आणि संस्कार यांची महत्त्व अधोरेखित केले. सूत्रसंचालन श्री एस एम कुलकर्णी सर यांनी केले तर आभार प्रदर्शन ज्येष्ठ शिक्षक श्री समीर दिवाण सर यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर आणि सातारा येथे माजी सैनिकांसाठी एकात्मिक कल्याण केंद्र उभारण्यास मान्यता : राज्यपाल जिष्णु देव वर्मा

## माजी सैनिकांचे पुनर्वसन व पुनर्स्थापनेसाठीच्या विशेष निधी (महाराष्ट्र) समितीची ५० वी वार्षिक बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पंढरपूर येथे मोठ्या प्रमाणात भाविक येतात. येथे वारी आणि दर्शनासाठी येणाऱ्या माजी सैनिकांच्या सोयीसाठी त्याचप्रमाणे सातारा येथेही एकात्मिक कल्याण केंद्र उभारण्यासाठी व्यवहार्यता पडताळून प्रस्ताव पाठविण्यास राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मान्यता दिली. माजी सैनिकांचे पुनर्वसन व पुनर्स्थापनेसाठीच्या विशेष निधी (महाराष्ट्र) समितीची ५० वी वार्षिक बैठक राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली लोकभवन येथे झाली. या बैठकीत माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी विविध महत्त्वपूर्ण प्रस्तावांनाही मान्यता देण्यात आली. पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव संतोष कुमार, महाराष्ट्र, गोवा व गुजरात प्रभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल डी. एस. कुशवाहा, रिअर डमिरल शंतनु झा, एअर व्हाइस मार्शल प्रशांत वडोदकर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सैनिक कल्याण संचालक तसेच संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. राज्यपाल हे माजी सैनिकांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना यासाठीच्या विशेष निधी समितीचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.



माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देणे. पुनर्स्थापना उपक्रमांना संस्थात्मक पाठबळ देणे, माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक गरजांची पूर्तता करणे, निधीच्या योग्य व पारदर्शक वापरावर देखरेख ठेवणे या उद्देशाने ही समिती कार्य करते.

या बैठकीत लष्करी मुला-मुलींची वसतिगृहे, माजी सैनिकांसाठी विश्रामगृहे, महासैनिक हॉल व लॉन्स तसेच पुणे येथील सैनिक कल्याण संचालनालयातील अशासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच किमान वेतन कायद्यानुसार करण्यात आलेल्या वेतन पुनर्निर्धारणालाही समितीने कार्योत्तर मान्यता दिली. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथील तसेच धुळे येथील मिलिटरी बॉईज हॉस्टेलचे माजी सैनिक विश्रामगृहात रूपांतर करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील विविध जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांच्या अखत्यारीतील लष्करी मुला-मुलींची वसतिगृहे, माजी सैनिक विश्रामगृहे तसेच महासैनिक हॉल व लॉन्स येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासही समितीने कार्योत्तर मान्यता दिली. या निर्णयामुळे ऊर्जा बचतीसह पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना मिळणार आहे. याशिवाय दुरुस्ती व नवीन बांधकामांच्या ब्लॉक अंदाजपत्रकांबाबतही समितीने चर्चा करून सविस्तर अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर मंजुरी देण्याचे अधिकार राज्य कार्यकारी समितीस प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी समितीमार्फत व्यावसायिक स्वरुपात चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्याचे निर्देश देऊन या उपक्रमांमध्ये माजी सैनिकांना प्राधान्याने रोजगार उपलब्ध व्हावा अशी सूचना केली.

मंत्री शंभूराज देसाई यांनी सातारा येथे माजी सैनिक कल्याण केंद्र उभारण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध असल्याचे सांगितले. या प्रस्तावास राज्यपालांनी सहमती दर्शवून पंढरपूरसह सातारा येथील केंद्रासाठी आर्थिक आणि अनुषंगिक बाबी तपासून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

---

## जागृत श्री शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान घोळसगाव येथे शनी अमावस्या यात्रा महोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडाच्या सरद्दीवर वसलेले अक्कलकोट तालुक्यातील घोळसगाव, तुळजापूर तालुक्यातील कुन्सावळी आणि उमरगा तालुक्यातील बोळेगाव शिवारातील जागृत श्री शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान घोळसगाव येथे शनी अमावस्या यात्रा महोत्सव निमित्य राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात सर्व राजकीय पक्षाचे नूतन जि.प.व प.स. सदस्यांचा सन्मान सोहळा सह विविध धार्मिक व देशभक्ती कार्यक्रम आयोजित केले असल्याची माहिती देवस्थान कमिटी अध्यक्ष तथा पंचायत समिती सदस्य आप्पासाहेब किंवडे यांनी दिली.



शनीअमावस्या यात्रा महोत्सव निमित्य शुक्रवार १५ रोजी रात्रभर भजन,भारुड, देशभक्ती कार्यक्रम होणार आहे. शनिवार १६ रोजी पहाटे श्री चे महापूजा, महारुद्राभिषेक कार्यक्रम होणार असून सकाळी सात वाजता घोळसगाव ग्राम प्रदिक्षण करीत विविध वाद्य समवेत श्री शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान पर्यत श्रीचे भव्य पालखी मिरवणूक सोहळा होणार आहे. यानंतर सन्मान सोहळा,सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज दर्शन सोहळा, महाप्रसाद कार्यक्रम होणार असल्याची माहिती शनिदेव पुजारी कुंभार यांनी दिली .

जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांचे शुभ हस्ते गुणवंत विद्यार्थांचा आणि अक्कलकोट, तुळजापूर आणि उमरगा तालुक्यातील सर्व राजकीय पक्षाचे नूतन जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्यांचा विशेष सत्कार सोहळा आयोजित केले आहे.शनिवार दि.१६ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शनेश्वर देवस्थान घोळसगाव येथे हा सन्मान सोहळा होणार आहे.यावेळी आ. सचिन दादा कल्याणशेट्टी अक्कलकोट, आ.राणा दादा पाटील तुळजापूर,आ.प्रवीण स्वामी उमरगा, माजी मंत्री सिध्दराम म्हेत्रे अक्कलकोट,माजी मंत्री बसवराज पाटील मुरूम,श्री स्वामी महाराज अन्नछत्र मंडळ कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले,वटवृक्ष श्री स्वामी महाराज देवस्थान अध्यक्ष तथा नगरसेवक महेश इंगळे, ओंकार शुगर समूह अध्यक्ष बापूराव बोत्रेपाटील, जय हिंद साखर कारखाना बब्रुवान काका माने,जि.प.माजी पक्ष नेता आनंद तानवडे,काँग्रेस तालुका अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील,माजी खासदार रवी गायकवाड, अक्कलकोट नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी, दुधनी नगरध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे,मैंदर्गी नगरध्यक्ष अंजली बाजारमठ, मुरूम नगरध्यक्ष बापूराव पाटील नळदुर्ग नगराध्यक्ष बसवराज अप्पा धरणे,भाजपा माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार,पोलिस निरीक्षक दिपक भिताडे,भाजपा उत्तर मंडल अध्यक्ष अमोल हिप्पर्गी प्रमुख उपस्थित राहणार असल्याची माहिती संचालक नागेश ढगे यांनी दिली.

अक्कलकोट पंचायत समिती सभापती रश्मी हिप्परगी, उपसभापती सागर कल्याणशेट्टी उमरगा पंचायत समिती सभापती आंकाक्षा चौघुले, तुळजापुर पं.स.उपसभापती रोहिणी मेलगीरी, शांभवी कल्याणशेट्टी, प्रविण तानवडे,शिवराज म्हेत्रे, विकास बुळ्ळा, शिवानी स्वामी, सिध्दाराम शिवमुर्ती इत्यादी अक्कलकोट जि.प.सदस्य, सिध्देश्वर कोरे , आप्पशा पाटील,श्रुती पणूरे इत्यादी धाराशिव जि.प. सदस्य, शितल म्हेत्रे, आशाताई इंगळे, विमलताई गव्हाणे, विनोद मोरे ,अप्पासाहेब किवडे, गणेश मोरे, उत्तम वाघमारे, वैष्णवी सलगरे,भिमण्णा सोलापूरे, संगीता पाटील इत्यादी अक्कलकोट पं.स. सदस्य आणि अमर वाले ,राजकुमार माने,अलका सुलतानपुर इत्यादी पं.स.सदस्य उमरगा तसेच भिवाजि इंगोले ,अँड.आशिष सोनटक्के इत्यादीं पं.स.सदस्य तुळजापूर सदस्यचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती सचिव राजेंद्र काळे दिली आहे.

---

## पालखेड वि.का.संस्थेच्या चेअरमनपदी रंजनामाई थेटे तर उपसभापतीपदी बाबासाहेब शिंदे यांची बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : पालखेड विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या चेअरमनपदी निफाड पंचायत समितीच्या माजी सदस्या तथा पिंपळगाव ब बाजार समितीच्या माजी संचालिका रंजनामाई भाऊसाहेब थेटे यांची तर उपसभापतीपदी रासाकाचे माजी व्हा. चेअरमन तथा पिंपळगाव ब बाजार समितीचे माजी संचालक बाबासाहेब शंकरराव शिंदे बिनविरोध निवड करण्यात आली.

> **ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आजपर्यंत विविध संस्थांमध्ये कामकाज केले असून संस्था व गावहितासाठी सर्वांना सोबत घेऊन समाजकारण- राजकारण केल्याची पावती म्हणुन आज सर्व संचालक,जेष्ठ नागरीक,सभासद व नागरीकांनी माझ्यावर जो विश्वास दाखवत चेअरमनपदाची संधी दिली त्याबद्दल सर्वांचे आभार मानते. यापुढेही सर्वांना सोबत घेऊन संस्था व सभासद हितासाठी कामकाज करेन.**
>
> **- सौ.रंजनामाई थेटे (नवनिर्वाचित चेअरमन,पालखेड सोसायटी)**

आवर्तनानुसार मावळते चेअरमन ज्ञानेश्वर जाधव व उपसभापती असलेले अंबादास कोकाटे यांनी आपल्या पदांचे राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागांवर निवडणूक निर्णय अधिकारी दत्तात्रय नाईकरे तर सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी माधव पगारे यांनी संचालक मंडळाची निफाडच्या सहाय्यक निबंधक कार्यालयात निवडसभा बोलाविण्यात आली होती.याप्रसंगी चेअरमनपदासाठी रंजनामाई थेटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला त्यावर सुचक म्हणून ज्ञानेश्वर जयराम जाधव यांनी तर उपसभापतीपदी बाबासाहेब शंकरराव शिंदे यांना सुचक बाळासाहेब बंडु थेटे यांनी स्वाक्षरी केली.

दिलेल्या विहित मुदतीत चेअरमन,व्हा.चेअरमन पदांकरीता एकच उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने संस्थेच्या चेअरमनपदी सौ.रंजनामाई भाऊसाहेब थेटे तर व्हा.चेअरमनपदी बाबासाहेब शिंदे यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणुक निर्णय अधिकारी नाईकरे यांनी जाहीर केले.यावेळी कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत आनंदोत्सव साजरा केला.



याप्रसंगी संचालक बाळासाहेब थेटे,ज्ञानेश्वर जाधव ,रावसाहेब शिंदे,विलास थेटे, बाबाजी आहेर , ज्ञानेश्वर आहेर,दशरथ जगझाप,अंबादास कोकाटे ,सौ आश्विनी आहेर,पंडित आहेर, हेमंत थेटे यांसह पोपटराव चौधरी,सुकदेव थेटे,श्रीधर जाधव,अनिल मेधने आदिंसह रमेश शिंदे,संकेत डोखळे,भाऊसाहेब थेटे,भाऊसाहेब शिंदे,बाळुनाना आहेर, संजय शिंदे, शरद जाधव, श्रीधर जाधव,केशव शिंदे,संजय थेटे, गणेश महाले, सतिष थेटे,पवन जाधव,भगवान थेटे,प्रमोद मतसागर आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनिर्वाचितांचे आमदार दिलीप बनकर माजी आमदार अनिल कदम,तालुकाध्यक्ष राजेंद्र डोखळे आदिंनी अभिनंदन केले आहे.


---

## पालखेड विद्यालयाचा इयत्ता १० वीचा ९४.६२% उत्कृष्ट निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे पालखेड येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाचा इयत्ता १० वीचा निकाल ९४.६२% लागलाअसून विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा यावर्षीही कायम राखली आहे.

विद्यालयात परीक्षेस एकूण प्रविष्ठ विद्यार्थी९६, गैरहजर०३ तर उत्तीर्ण विद्यार्थी ८८ झाले असून अनुक्रमे प्रथम पाच गुणवंत विद्यार्थ्यांचे निकाल पुढीलप्रमाणे आहेत.



प्रथम अक्षदा जगताप ९१.६०%,द्वितीय विना थेटे ८८.६०%,तृतीय नयना आहेर ८८.२०%,चतुर्थ साई शेळके ८७.४०%,पाचवा सिद्धेश्वर पवार ८६.८०% असे आहेत. तसेच विशेष प्राविण्य श्रेणीत २५ विद्यार्थी,प्रथम श्रेणीत २९,द्वितीय श्रेणीत २०,उत्तीर्ण श्रेणीत १४ विद्यार्थी आहेत.सदर सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे,उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे,कार्यकारी संचालक प्रा.दीपक जोंधळे, कार्याध्यक्ष तथा सचिव दत्तात्रेय जोंधळे,स्थानिक स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष अशोक आहेर,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश थेटे,शिक्षक-पालक संघाचे अध्यक्ष विजय आहेर,उपाध्यक्ष रवींद्र कोकाटे,मुख्याध्यापक अशोक शेळके व सर्व कमिटी सदस्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

---

**सोलापूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा**

## पानमंगरुळच्या सुपुत्राची ऐतिहासिक झेप ; अभिषेक कत्ते यांची इइंडियन फॉरेस्ट सर्विस'मध्ये क्लास वन ऑफिसर म्हणून निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पानमंगरुळ (प्रतिनिधी): अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरुळ या छोट्याशा गावातील सुपुत्र अभिषेक योगिराज कत्ते यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (णझडउ) घेण्यात आलेल्या अत्यंत कठीण अशा भारतीय वन सेवा (खपवळरप ऋेीशीीं डशीींळलश - खऋड) परीक्षेत देदीप्यमान यश संपादन करून संपूर्ण जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला आहे. त्यांची 'क्लास वन ऑफिसर' पदी निवड झाल्याची वार्ता समजताच सोलापूर जिल्ह्यातून आणि विशेषतः अक्कलकोट तालुक्यातून त्याच्यावर कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अभिषेक यांनी मिळवलेले हे यश केवळ एका व्यक्तीचे यश नसून, ते ग्रामीण भागातील जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाचे प्रतीक मानले जात आहे. अत्यंत प्रतिष्ठित अशा या सेवेत स्थान मिळवून त्यांनी आपल्या गावाचे नाव राष्ट्रीय स्तरावर उंचावले असून, या निवडीमुळे त्यांना आता वनविभागाच्या वरिष्ठ प्रशासकीय रचनेत उच्च पदस्थ अधिकारी म्हणून देशसेवा करण्याची संधी मिळणार आहे.

अभिषेक कत्ते यांचा हा यशस्वी प्रवास कोणत्याही मोठ्या शहराच्या सुविधांशिवाय, केवळ ग्रामीण भागातील जिद्दीच्या जोरावर सुरू झाला. त्यांच्या घरातच शिक्षणाची मोठी परंपरा असून, वडील योगिराज कत्ते हे नूतन विद्यालय मगरुळ येथून वरिष्ठ लिपिक म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत, तर आई सुरेखा कत्ते या गृहिणी असून त्यांचेही शिक्षण बी.ए. बी.एड. पर्यंत झाले आहे. भाऊ-अमर हा ही उच्चशिक्षित असून सध्या शेती करत आहे. अभिषेक यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा मंगरुळ येथे झाले, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सोलापूरच्या गांधीनाथ रंगजी विद्यालय व दयानंद महाविद्यालयात पूर्ण झाले. त्यानंतर त्यांनी कराड आणि सांगली येथून आयटी बी.टेक. पदवी संपादन केली. करिअरच्या सुरुवातीला २०१५ ते २०१७या काळात त्यांनी 'एक्सिचेअर' कंपनीत नोकरी केली. विशेष म्हणजे, २०१७ मध्ये त्यांना कंपनीकडून जर्मनीला जाण्याची मोठी संधी चालून आली होती, मात्र परदेशातील ती आकर्षक नोकरी नाकारून देशसेवेचे ध्येय उराशी बाळगत त्यांनी यूपीएससीच्या तयारीसाठी थेट दिल्ली गाठली.

दिल्लीत दोन वर्षे कठोर परिश्रम घेतल्यानंतर २०१९ मध्ये त्यांनी पहिल्यांदा मुख्य परीक्षा उत्तीर्ण केली, परंतु अंतिम यशाने त्यांना चार वेळा हुलकावणी दिली. मात्र, अपयशाने खचून न जाता पाचव्या प्रयत्नात त्यांनी आपले स्वप्न सत्यात उतरवले. अभिषेक यांनी दाखवलेली ही सोशिकता आणि जिद्द पाहून 'पट्ट्याने नाद केला पण तो वाया नाही गेला' अशीच भावना संपूर्ण तालुक्यात व्यक्त होत आहे. त्यांच्या या यशामागे त्यांचे आई-वडील, भाऊ आणि गुरुजनांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

अभिषेक यांच्या यशाची बातमी धडकताच पानमंगरुळ गावात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली आणि पेढे बाटून मोठा जल्लोष साजरा करण्यात आला. ग्रामीण भागातील मुलेही प्रशासकीय सेवेत सर्वोच्च पदावर पोहोचू शकतात, हे अभिषेकने सिद्ध केले आहे.



अशा शब्दांत ग्रामस्थांनी आपला अभिमान व्यक्त केला असून, हा निकाल तालुक्यातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या इतर हजारो विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# दोषींना कठोर शिक्षा द्या, मास्टरमाइंडचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक नेमा : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची मागणी!

## डॉ. विश्वासराव आरोटे आक्रमक; पत्रकारांवर हल्ले सहन केले जाणार नाहीत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ज्येष्ठ पत्रकार, संपादक, सामाजिक कार्यकर्ते, संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संघटक तसेच श्री अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष

मार्गदर्शक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट उघडकीस आल्यानंतर राज्यभरातील पत्रकारांमध्ये संतापाची तीव्र लाट उसळली आहे. पत्रकारिता, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान देणाऱ्या भोकरे परिवाराला लक्ष्य करून काही समाजकंटकांनी हा कट रचल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून कटामागील खरा मास्टरमाइंड शोधून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केली आहे.

एका खाजगी वृत्तवाहिनीला मुलाखत देताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी अत्यंत संतप्त शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, संजय भोकरे यांनी आयुष्यभर सर्वसामान्य पत्रकारांसाठी संघर्ष केला. ग्रामीण भागातील पत्रकारांना संघटित करून त्यांना न्याय, सन्मान आणि ओळख मिळवून देण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले आहे. महाराष्ट्र, गोवा, दिल्ली, बेळगाव आणि गुजरातसह विविध राज्यांमध्ये पत्रकार संघटनांचे जाळे उभे करून हजारो पत्रकारांना त्यांनी दिशा दिली.

डॉ. आरोटे म्हणाले की, संजय भोकरे हे केवळ पत्रकार नाहीत, तर ते पत्रकारांच्या हक्कांसाठी लढणारे नेतृत्व आहे. त्यांनी अनेकांना उभे केले, संघटनांना बळ दिले आणि पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्य घालवले. अशा व्यक्तीवर जीवघेणा कट रचला जाणे ही संपूर्ण पत्रकारितेसाठी धोक्याची घंटा आहे.

दोन एकर संस्थेच्या जागेसाठी रचला कट?

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे संबंधित दोन एकर जागा ही कोणत्याही व्यक्तीची खासगी मालमत्ता नसून संस्थेची मालमत्ता असल्याचे समोर आले आहे. ही जागा हस्तगत करण्यासाठीच काही मास्टरमाइंड लोकांनी संजय भोकरे यांना जीवे मारण्याची सुपारी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे.

या कटामध्ये सहभागी असलेल्या तिघांना पोलिसांनी अटक केली असून, चौकशीत सुपारी देणाऱ्या व्यक्तीचे नाव समोर आल्याची माहिती आहे. मात्र या संपूर्ण कटामागे आणखी मोठा सूत्रधार असल्याची चर्चा सुरू आहे. पोलिसांनी या दिशेने तपास अधिक वेगाने करावा, अशी मागणी पत्रकार संघटनांकडून केली जात आहे.

डॉ. आरोटे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, भोकरे हे या मालमत्तेच्या गैरव्यवहारात अडसर ठरत होते. त्यामुळे त्यांना कायमचे संपवून जागा बळकावण्याचा प्रयत्न झाला. पण पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा मोठा कट उधळला गेला. अन्यथा राज्याने एक निर्भीड पत्रकार गमावला असता.

■ संजय भोकरे यांच्या हत्येचा कट उघड; पत्रकारांमध्ये संतापाची लाट!
■ दोन एकर संस्थेच्या जागेसाठी रचला जीवघेणा कट? तीन आरोपी अटकेत!
■ संजय भोकरे यांना झेड प्लस सुरक्षा द्या; महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची मागणी!
■ पत्रकार सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर; जिल्हानिहाय आंदोलनाचा इशारा!
■ भोकरे परिवाराला लक्ष्य करण्यामागे मोठे षड्यंत्र? गृह मंत्रालयाने हस्तक्षेप करावा!
■ आज संजय भोकरे, उद्या कोणताही पत्रकार – पत्रकार संघाचा इशारा!
■ डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून

सिद्धार्थ भोकरे यांनाही यापूर्वी धमक्या:

डॉ. आरोटे यांनी यावेळी आणखी एक धक्कादायक माहिती दिली. डिजिटल मीडिया विभागाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांनाही काही महिन्यांपूर्वी पुण्यावरून जीवे मारण्याच्या धमक्या आल्या होत्या. त्यामुळे भोकरे परिवाराला नियोजनबद्ध पद्धतीने लक्ष्य केले जात असल्याचा संशय व्यक्त होत आहे.

पत्रकारिता, सामाजिक कार्य आणि शैक्षणिक क्षेत्रात भोकरे परिवाराने मोठे कार्य उभे केले आहे. अनेक वर्षांच्या संघर्षातून त्यांनी संस्था उभ्या केल्या. त्यामुळे काही समाजकंटकांच्या डोळ्यात ते खुपत होते, असे डॉ. आरोटे म्हणाले.

पत्रकार सुरक्षित नसतील तर लोकशाही धोक्यात

पत्रकारांवरील वाढत्या हल्ल्यांबाबत चिंता व्यक्त करताना डॉ. आरोटे यांनी शासनावरही टीका केली. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. जर पत्रकारांनाच संरक्षण नसेल, तर लोकशाही सुरक्षित राहणार नाही. आज संजय भोकरे यांच्यावर ही वेळ आली आहे; उद्या राज्यातील कोणत्याही पत्रकारावर येऊ शकते, असे ते म्हणाले.

त्यांनी मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांना उद्देशून म्हटले की, या प्रकरणाचा तपास केवळ औपचारिक राहू नये. या कटामागील प्रत्येक सूत्रधार बाहेर आला पाहिजे. यासाठी विशेष तपास पथक (डखढ) स्थापन करून स्वतंत्र चौकशी करावी.

झेड प्लस सुरक्षेची मागणी:

संजय भोकरे यांच्या जीवाला अजूनही धोका असल्याचे सांगत त्यांना उच्चस्तरीय सुरक्षा देण्याची मागणीही करण्यात आली आहे. ज्या पद्धतीने त्यांच्यावर कट रचला गेला, त्यावरून त्यांना अजूनही धोका आहे. त्यामुळे शासनाने त्यांना तातडीने झेड प्लस सुरक्षा द्यावी, अशी मागणी डॉ. आरोटे यांनी केली.

राज्यभर आंदोलनाचा इशारा:

या प्रकरणाच्या निषेधार्थ राज्यातील पत्रकारांनी एकत्र येण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने केले आहे. प्रत्येक जिल्हा व तालुकास्तरावर निवेदने देऊन पत्रकार सुरक्षेचा मुद्दा लावून धरण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

आम्ही चांगल्याला चांगले म्हणतो आणि वाईटाला वाईट म्हणण्याची ताकद ठेवतो. पत्रकारांवर अन्याय झाला तर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ शांत बसणार नाही, असा इशाराही डॉ. आरोटे यांनी दिला.

पत्रकार सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर:

संजय भोकरे हत्याकट प्रकरणामुळे राज्यात पत्रकार सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पत्रकारांवर वाढते हल्ले, धमक्या आणि दबावाच्या घटनांमुळे स्वतंत्र पत्रकारिता धोक्यात येत असल्याची भावना पत्रकार संघटनांनी व्यक्त केली आहे.

या प्रकरणात दोषींना कठोर शिक्षा होऊन खरा मास्टरमाइंड समोर येतो का, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

---

# अवघ्या एका आठवड्यात दोन बालविवाह रोखण्यात मंद्रूप पोलिसांना यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुक्यात अवघ्या एका आठवड्यात दोन बालविवाह उधळून लावून मंद्रूप पोलिसांची धडाकेबाज कारवाई सोलापूर जिल्ह्यातील मंद्रूप पोलीस स्टेशन हद्दीत बालविवा सारख्या गंभीर सामाजिक गुन्ह्याविरोधात मंद्रूप पोलिसांनी कडक भूमिका घेतली आणि मोठी कारवाई केली आहे

पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे तसेच बालकल्याण पथकाने अवघ्या एका आठवड्यात दोन बालविवाह रोखण्यात यश मिळवले आहे गुप्त माहिती व स्थानिकांकडून मिळालेल्या सूचनांच्या आधारे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी भावगीत संबंधित कुटुंबीयांना कायद्याची जाणीव करून दिली व बालविवाह प्रतिबंधक कायदा अंतर्गत होणाऱ्या गंभीर परिणामाची माहिती दोन्ही बालविवाह तात्काळ थांबवण्यात आली. पोलिसांच्या या धाडसी आणि संविधानशील हस्तक्षेपामुळे दोन अल्पवयीन मुलींचे आयुष्य उध्वस्त होण्यापासून वाचले आहे आजही ग्रामीण भागात परंपरा सामाजिक दबाव आणि अज्ञानामुळे बालविवाहाच्या घटना घडताना दिसतात मात्र मंद्रूप पोलिसांनी दाखवलेली तत्परता आणि सामाजिक बांधिलकी ही इतरांसाठी आदर्श ठरत आहे व या कारवाईमुळे परिसरात पोलिसांविषयी विश्वास आणि आदर अधिक वाढला असून नागरिकाकडून मंद्रूप पोलिसांची कौतुक होत आहे बालविवाह केवळ कायद्याचा मंग नसून मुलांच्या भविष्यावर झाला आहे अशा प्रकारच्या कोणीही सांडभोवती दाखवून



दिली जाणार नाही असा इशारा पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांनी दिली आहे मंद्रूप पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शंकर पटवारी व पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे आणि बालकल्याण पथक यांच्या उल्लेखनीय कार्यामुळे दोन निष्पाप आयुष्यमान संजीवनी मिळाले असून सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने एक महत्त्वाची पाऊल उचललेले गेले आहे सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर विभाग सोलापूर श्री संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंद्रूप पोलिस स्टेशनचे पोलीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पटवारी पोलीस उपनिरीक्षक राजे राजकुमार डांगे शिर्डी काशीद सह फौजदार पप्पू शिंदे पोलीस हवलदार शहानुर मुलानी पोलीस कॉन्स्टेबल संदीप काळे ज्ञानेश्वर भोसले विशाल कळणारकर महिला पोलीस कॉन्स्टेबल सविता गव्हाणे यांनी केली आहे.

---

मातृदिनानिमित्त आयआयटी कॉम्प्युटर्स, पंढरपूर येथे अनोखा उपक्रम

# आई शिकली संगणक उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मातृदिनाचे औचित्य साधत आयआयटी कॉम्प्युटर्स पंढरपूर येथे एक आगळावेगळा आणि भावनिक उपक्रम उत्साहात पार पडला. ग्रामीण तसेच शहरी भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या आईंना क्लासमध्ये आमंत्रित करून स्वतः संगणकाचे प्रशिक्षण दिले. आई शिकली संगणक या उपक्रमामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते.

या विशेष उपक्रमामध्ये अनेक माता प्रथमच संगणकासमोर बसल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या आईंच्या हातात माउस देत संगणकाची प्राथमिक माहिती, इंटरनेटचा वापर तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ख) विषयी माहिती दिली. स्वतःची मुले आपल्याला आधुनिक तंत्रज्ञान शिकवत असल्याचे पाहून अनेक मातांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत येणाऱ्या प्रत्येक मातांचे गुलाब पुष्प व थंड कोकम ज्यूस देऊन स्वागत करण्यात आले. मातृदिनाचे औचित्य साधून आईप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा उपक्रम सर्वांच्या मनाला स्पर्शून गेला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहिणी मांजरे, दीपाली आसबे व सोनाली कळकुंबे यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी दत्ता कळकुंबे यांनी उपस्थित सर्व मातांना मातृदिनाच्या शुभेच्छा दिल्या. संस्थेचे संचालक नितीन आसबे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या अभिनव उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून आई आणि तंत्रज्ञान यांची सुंदर सांगड घालणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

---

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातून नागरिकांचे समाधान

# महसूल विभागाकडून चळे व तुंगत मंडळात १ हजार ५२६ दाखले, सेवांचे वितरण : तहसीलदार सचिन लंगुटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर महसूल विभागाशी संबंधित नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे राबविण्यात येत आहे. या अभियानातर्गत आज दिनांक १४ रोजी पंढरपूर तालुक्यातील चळे व तुंगत मंडळातून १ हजार ५२६ विविध सेवा व विविध दाखले देण्यात आले असल्याची माहित तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली.




या अभियानातर्गत चळे व तुंगत येथील शिबिरात निकाली काढण्यात आलेले फेरफार १०८, सातबारा मधील दुरुस्ती १६, डिजिटल सातबारा ३८४, ८ अ उतारे ३१२, प्रमाणपत्रे ४६९, एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत निकालात काढण्यात आलेले अर्ज ०५, भूसंपादन प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करण्यात आलेली प्रकरणे १७, अद्यावत अभिलेख ५९, वर्ग दोन जमिन वर्ग एक करण्याबाबत कार्यवाही १६, सामाजिक योजना ४९, शिधापत्रिका ११, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन व कृषी सिंचन योजना ५०, आभा कार्ड एच.बी, तपासणी व औषधोपचार २०, ई- मोजणी फेरफार नकाशा १० आदी सेवा व दाखले देण्यात आले.

यामध्ये चळे मंडळातून ७३१ तर तुंगत मंडळातून ७९५ असे एकूण १ हजार ५२६ विविध सुविधा एकाच छताखाली पुरवण्यात आल्याचे तहसीलदार सचिन लंगुटे यांनी सांगितले. पंढरपूर तालुक्यातील संबधीत मंडळातील जास्तीत जास्त नागरिकांनी या महाराजस्व समाधान शिबिर मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार लंगुटे यांनी केले आहे.

यावेळी आमदार अभिजीत पाटील, जि.प.सदस्य गितांजली साळुंखे, पं.स.सदस्य अतुल गायकवाड, सरपंच ज्ञानेश्वर शिखरे, अमृता रणदिवे, प्रांताधिकारी सचिन इथापे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन हरीश गायकवाड, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, दीपक शिंदे आदीसह मंडळाधिकारी, तलाठी, ग्रामस्थ उपस्थित होते.

---

# दहावीत अव्वल विद्यार्थ्यांचा ओम शांती कॉम्प्युटर क्लासेसकडून गौरव

### पडघा परिसरातील गुणवंत विद्यार्थी व पालकांचा होणार सन्मान; विद्यार्थ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव : महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा दहावीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा ओम शांती कॉम्प्युटर क्लासेस, पडघा यांच्या वतीने विशेष सन्मान करण्यात येणार आहे. पडघा परिसरातील विविध शाळांमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचाही गौरव करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सन्मान सोहळ्यात आदर्श विद्यालय, कुरुंद, शारदा विद्यालय पडघा, डी. के. सूर्यराव विद्यालय तळवली, डी. डी. पाटील विद्यालय लाप, बी. बी. पाटील विद्यालय कुरुंद, बी. ए. राऊत विद्यालय पाच्छापूर, टी. ए. पाटील इंग्रजी शाळा पडघा, आर. के. पालवी इंग्रजी शाळा पडघा, के. एम. ई. एस., एम. के. सी., प्रोग्रेसिव्ह न्यू इंग्लिश मीडियम स्कूल भोईरपाडा, एस. एम. वाय. रईस हायस्कूल तळवली तसेच परिसरातील इतर शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचाही समावेश करण्यात येणार आहे.




दहावीत उत्कृष्ट यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी ओम शांती कॉम्प्युटर क्लासेस येथे संपर्क साधून आपल्या सहभागाची नोंद करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, शैक्षणिक चळवळ अधिक गतिमान व्हावी आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव व्हावा या उद्देशाने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे, असे ओम शांती कॉम्प्युटर क्लासेसचे संचालक संजय पटेल आणि पूजा पवार यांनी सांगितले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार असून, इतर विद्यार्थ्यांनाही शिक्षणासाठी प्रेरणा मिळणार असल्याची भावना पालक व नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.